क्रमांक : १४७२० /म.वि.स./जनसंपर्क
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ जुलै, २०१९

# :: प रि प त्र क ::

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्षांना निदेशानुसार कळविण्यात येते की, सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यमान १३ व्या महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ माहे, नोव्हेंबर, २०१९ मध्ये संपुष्टात येऊन त्याचवेळी नवीन १४ वी विधानसभा अस्तित्वात येईल. नव्याने गठित होणाऱ्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात विधानसभा सदस्यांना प्रथेप्रमाणे या सचिवालयातील कक्षांद्वारे प्रकाशित केलेली विविध प्रकाशने, माहिती पुस्तिका, बॅजेस, ओळखपत्र तसेच अन्य साहित्य वितरीत करण्यात येणार आहे.

नव्याने गठित होणाऱ्या १४ व्या विधानसभेच्या पार्श्वभूमीवर नजीकच्या कालावधीतील कामकाजाचे नियोजन व कक्षनिहाय आढावा या संदर्भात सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचेसमवेत शुक्रवार, दिनांक १९ जुलै, २०१९ रोजी या सचिवालयातील सर्व संबंधित कक्ष अधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर आयोजित केलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या सचिवालयातील संबंधित कक्षांनी नवनिर्वाचित सदस्यांना वितरीत करावयाच्या पुस्तिका/प्रकाशने इत्यादी संदर्भात आढावा घेण्यात आला व संबंधित कक्षांनी याबाबतचे कामकाज तातडीने सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व नवनिर्वाचित मा.सदस्यांना वितरीत करावयाच्या अन्य पुस्तिकांसमवेत (१) महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका व (२) महाराष्ट्र विधानपरिषद मार्गदर्शिका ही दोन प्रकाशने वितरीत करण्यात येणार आहेत. याबाबत सर्व कक्षांनी बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजीपर्यंत मार्गदर्शिकांमध्ये समाविष्ट करावयाची अद्यायावत माहिती 'जनसंपर्क' कक्षाकडे पाठविण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी असे निदेश सचिव (कार्यभार), मविस यांनी दिले आहेत.

मार्गदर्शिकांमध्ये समाविष्ट करावयाची माहिती पाठविणेबाबत संबंधित कक्षांनी/अधिकाऱ्यांनी खालील नमूद केलेल्या बाबींसंदर्भात दक्षता घेण्यात यावी.

..२/-

(१) महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका व महाराष्ट्र विधानपरिषद मार्गदर्शिका या दोन्ही प्रकाशनांमध्ये सन २००९ ते २०१९ या कालावधीत माहिती समाविष्ट करणे आवश्यक असल्याने अनुक्रमे सन २००९ व सन २०११ मध्ये प्रकाशित केलेल्या मार्गदर्शिकांच्या संदर्भानुसार कक्षांनी माहिती संकलित करावी.

(२) सर्व कक्षांनी माहिती पाठवितांना सचिव (कार्यभार), मविस यांचे मान्यतेनंतरच माहिती जनसंपर्क कक्षाकडे पाठविण्यात यावी.

(३) मार्गदर्शिकांमध्ये समाविष्ट करावयाची माहिती अचूक व मुद्देसूद असावी, शक्यतो लांबलचक नसावी, वारंवारता टाळण्यात यावी, इंग्रजी शब्दांचा वापर कमीतकमी व गरजेनुसारच करण्यात यावा तसेच आवश्यकतेनुसार इंग्रजी शब्दांसाठी पर्यायी मराठी शब्दांचा वापर करण्यात यावा. सदर माहिती नियम, अधिनियम, शासन निर्णय, संविधान इत्यादी बाबी विचारात घेऊनच पाठविण्यात यावी.

(४) माहिती पाठविताना सन २००९ ते २०१९ या कालावधीत त्या-त्या संदर्भात झालेला बदल, सुधारणा, नवीन घटना / निर्णय इत्यादी सर्व बाबी विचारात घेण्यात याव्यात.

(५) माहिती सादर करतांना माहितीचा FONT DVBW-TT Yogesh मध्ये असणे आवश्यक आहे.

सबब, या सचिवालयातील सर्व कक्षांनी संबंधित माहितीच्या दोन प्रती हार्डकॉपी स्वरुपात व पेन-ड्राईव्ह मध्ये सॉफ्टकॉपी स्वरुपात **बुधवार, दिनांक ३१ जुलै,२०१९ रोजी पर्यंत** 'जनसंपर्क' कक्ष (कक्ष क्रमांक ८०४, आठवा मजला, विधान भवन, मुंबई) येथे पाठविण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

23/7/2019

(सुनिल झोरे)
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.